SHRI GULABRAO ESHWARA KHANDVE EDUCATIONAL FOUNDATION

JAGADGURU INTERNATIONAL SCHOOL

LOHEGAON, PUNE 411047

PERIODIC TEST - II (A.Y. 2025-2026)

Name of Student: ______________________ Subject: Marathi (009)

Class & Div.:__________ Date: 15 /10/ 2025

Roll No. : _______ Time.: 90 Minutes

| Marks Obtained | |
|---|---|
| Total Marks :- | 40 |

Invigilator Examiner Moderator

## विभाग –'अ '- वाचन व आकलन -गुण 8

**प्रश्न 1 ) खालील उतारा वाचा व त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा .**

१९४५ साली भारतात ऑस्ट्रेलियन सर्व्हिसेसचा एक क्रिकेट संघ पुण्यात आला होता. पूना क्लबच्या ग्राऊंडवर त्याची एक मॅच झाली. या सामन्याला अर्थात तिकीट होते व मैदानावर गोलाकार कनात घालण्यात आलेली होती. त्यामुळे आत जाण्याचे सर्व मार्ग बंद होते. ही मॅच तर पाहायलाच पाहिजे आणि तीही फुकटात, म्हणून माझी धडपड सुरू झाली. सुदैवाने हा प्रश्न ग्राऊंडच्या बाजूला असलेल्या मोठाल्या झाडांनी सोडवला. माझ्या काही मित्रांसहित झाडावर बसून मी दिवसभर मॅच पाहात होतो आणि अजूनही वाटते, की पुन्हा एकदा तसेच झाडावर चढावे आणि तिथूनच मनसोक्त मॅच पाहावी. मी आणि माझे मित्र मॅचचे वर्णन आमच्या बुद्धीप्रमाणे जोरजोरात हातवारे करून इतरांना ऐकवत असू, दिवसाचा खेळ झाल्यावर कोणी झेल कसा घेतला-कसा सोडला, दांडी कशी उडाली, चौकार कसा मारला याची रसभरित चर्चा करतच आम्ही चालत चालत घरी परतत असू. ही मॅच पाहिल्यावर तिचा माझ्या मनावर फारच परिणाम झाला. विशेषत: मॅच संपल्यावर खेळाडूंच्या स्वाक्षऱ्या घेण्यासाठी जी झिम्मड उडते, तेव्हाचे ते दृश्य काळजात भिडले. काही खेळाडू आनंदाने स्वाक्षरी देत होते, तर काही नाकारत होते. हा सर्व सोहळा पाहून मनात आले, की आपणही एक मोठे खेळाडू व्हावे. मग आपल्या भोवतीही अशीच स्वाक्षरीसाठी गर्दी होईल. बस्, तेव्हापासून स्वाक्षरीच्या तालमीला सुरुवात झाली! विशेष म्हणजे वर्गात गणिताच्या तासाला वहीची अनेक पाने माझ्या स्वाक्षरीने भरू लागली. जर चुकूनमाकून शिक्षकांचे माझ्याकडे लक्ष गेलेच व मला प्रश्न विचारलाच तर न कळत माझ्या तोंडातून, 'हाऊज दॅट?' असे उत्तर बाहेर पडे! हे उद्‌गार ऐकून वर्गात एकच हशा होई आणि माझी मान लाजेने खाली होई; पण हीच लाजेने खाली घातलेली मान मी जेव्हा थोड्याच दिवसांनी आंतरशालेय सामन्यात १०० धावा केल्या, तेव्हा सर्वांच्या डोळ्यांतील कौतुकांचे भाव पाहाण्यासाठी अभिमानाने वर झाली. माझे नाव मोठ्या अक्षरांत शाळेच्या बोर्डावर झळकले. विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी माझ्या पाठीवर शाबासकीची थाप दिली आणि त्याच वेळी प्रथम मला क्रिकेट खेळत असल्याबद्दल धन्य-धन्य वाटले.

**A ) उतारा वाचून त्या आधारे खालील उत्तरे पर्यायांमधून निवडा . ( कोणतेही 8 ) ( 8 x 1=8 )**

I ) लेखकांना प्रथम क्रिकेट खेळत असल्या बद्दल धन्य धन्य केव्हा वाटले ?

a ) विद्यार्थांनी शाबासकीची थाप दिली तेव्हा

b ) शिक्षकांनी शाबासकीची थाप दिली तेव्हा

c ) विद्यार्थांनी व शिक्षकांनी शाबासकीची थाप दिली तेव्हा

d )त्यांनी १०० धावा केल्या म्हणून

II ) लेखकांची कोणत्या गोष्टीसाठी धडपड चालू होती ?

a ) झाडावर चढण्यासाठी
b ) आत जाण्याचे सर्व मार्ग बंद होते म्हणून
c ) मॅच पहायची पण ती फुकटात यासाठी
d ) मित्रांना भेटण्यासाठी

III ) लेखकांच्या कोणते दृश्य काळजात भिडले ?

a ) मॅच संपल्यावर खेळाडूंच्या स्वाक्षऱ्या घेण्यासाठी चे दृश्य
b ) मॅच संपल्यावर खेळाडूंना पाहण्यासाठी चे दृश्य
c ) मॅच चालू होण्यासाठी खेळाडूंना पाहण्यासाठी चे दृश्य
d ) मॅच चालू असताना खेळ पाहण्यासाठी चे दृश्य

IV ) ------------तासाला वहीची अनेक पाने माझ्या स्वाक्षरीने भरू लागली .

a ) इतिहासाच्या
b ) मराठीच्या
c ) गणिताच्या
d ) इंग्रजीच्या

V ) लेखकांनी कश्याच्या तालमीला सुरवात केली .

a ) खेळाच्या
b ) स्वाक्षरीच्या
c ) क्रिकेटच्या
d ) अभ्यासाच्या

VI ) १९४५ मध्ये ---------- ग्राउंड वर एक मॅच झाली .

a ) मुंबईच्या
b ) पुणे क्लबच्या
c ) पुना क्लबच्या
d ) डेक्कन क्लबच्या

VII ) खालील पैकी कोणते विधान अयोग्य आहे .

a ) लेखकांच्या मनात क्रिकेटचे बीज पेरले गेले आणि उगवले
b ) लेखकांचे नाव मोठ्या अक्षरात शाळेच्या बोर्डावर झळकले .
c ) लेखक काही मित्रांसोबत बसून झाडावर बसून मॅच पाहत होते .
d ) लेखकांनी शाळेमध्ये सामन्यात १०० धावा केल्या

VIII ) " बीज पेरले गेले " वाक्य प्रचाराचा अर्थ

a ) नवीन सुरवात करणे
b ) बियांची पेरणी करणे
c ) बीज जमिनीत पुरणे
d ) एखाद्या विषयी वाईट वाटणे

IX ) " चौकार " चा अर्थ

a ) 6 धावा
b ) चारही बाजूंना
c ) ४ धावा
d ) चौका चौकात

## <u>विभाग 'ब'-व्याकरण - गुण 12</u>

**प्रश्न 2 . A ) सूचनेनुसार कृती करा. ( कोणतेही ४ )** **( 4 x 1 =4 )**

i )मी धावत गेलो आणि गाडी पकडण्याचा प्रयत्न केला पण गाडी जवळून निघून गेली . ( उभयान्वयी अव्यय ओळखा व लिहा )

a ) जवळून b ) पण c ) पकडण्याचा d ) निघून गेली

ii ) असेच यश तुला मिळत राहो ( दिलेल्या वाक्यासाठी योग्य केवळ प्रयोगी अव्यय कोणते ते ओळखा )

a ) बापरे b )अरेवा c ) शाबास d ) )अरेबापरे

iii ) वाचनातून आनंद <u>घ्यायचा</u> आणि तो दुसऱ्यांना वाटायचा . (अधोरेखित शब्दाची जात व ओळखा )

a ) क्रियाविशेषण b ) क्रियापद c ) विशेषण d ) नाम

iv ) खालील पैकी योग्य विधान कोणते ?

a )शब्दयोगी अव्यय म्हणजे जे अव्यय शब्दाला जोडल्याने त्या शब्दाचा इतर दुसऱ्या शब्दाशी संबंध समजतो
b ) शब्दयोगी अव्यय म्हणजे जे अव्यय वाक्यांना जोडल्याने त्या शब्दाचा इतर दुसऱ्या शब्दाशी संबंध समजतो
c ) शब्दयोगी अव्यय म्हणजे जे अव्यय दोन वाक्यांना जोडल्याने त्या शब्दाचा इतर दुसऱ्या शब्दाशी संबंध समजतो
d ) शब्दयोगी अव्यय म्हणजे दोन शब्दांना जोडणारे अक्षर

v ) खालील गटात न बसणारा शब्द कोणता ?

a ) हात b ) बाहू c ) भुजा d ) हस्तदंत

**B ) सूचनेनुसार कृती करा. ( कोणतेही ३ )** **( 3 x 1 =3 )**

i ) " त्यांना मी कसा विसरू शकेन "( योग्य विधानार्थी वाक्य कोणते )

a ) कसा मी विसरू त्यांना ?

b ) त्यांना मी विसरू शकत नाही .

c ) त्यांना मी वासरू शकेन

d ) त्यांना मी विसरणार .

ii ) अचूक शब्द ओळखा .

a ) उज्वल b ) उज्ज्वल c ) ऊज्वल d ) उज्वळ

iii ) " हुरळून जाणे " वाक्याप्रचाराचा योग्य अर्थ कोणता ?

a ) खूप आनंद होणे b ) खूप दुख होणे c ) खूप घाबरणे d )जळून जाणे

iv ) अचूक शब्द ओळखा .

a ) वाताहर b ) वार्ताहर c ) व्रताहार d ) वार्ताहार

**c ) सूचनेनुसार कृती करा** **( 3 x 1 =3 )**

I ) खालील पैकी भिन्न लिंगी शब्दाचा योग्य पर्याय ओळखा लिहा.

a ) ध्वज b ) कार्यक्रम c ) रेल्वे d ) हार

II ) लिंग विचारानुसार गटात न बसणारा शब्द ओळखा .

a ) किल्ली b ) गृहस्थ c ) चित्रकार d ) म्हातारा

III ) पुढीलपैकी नपुसकलिंगी शब्द कोणता ते ओळखा .

a ) पुस्तक b ) पेन्सिल c ) पिशवी d ) चेंडू

**D ) सूचनेनुसार कृती करा ( कोणतेही २)** **( 2 x 1 =2 )**

I ) खालील पैकी समास प्रकारच्या आधारे गटात न बसणारा शब्द कोणता ?

a ) हरी हर b ) बहिण भाऊ c ) विटीदांडू d) काळागोरा

II ) " धर्माधर्म "समासाचा विग्रह ओळखा

a ) धर्म आणि अधर्म b ) धर्म किवा अधर्म c ) धर्म ,अधर्म सर्व d ) सर्व

III ) " चहा पाणी " शब्दाचा समास ओळखा

a ) इतरेतर द्वंद b ) वैकल्पिक c ) समाहार द्वंद्व d ) अव्ययीभाव

## <u>विभाग 'क' पाठ्यपुस्तक आधारीत - गुण 20</u>

**प्रश्न 3 A .सूचनेनुसार कृती करा .** **( 10 x 1 =10 )**

I ) स्वप्न करू साकार " कवितेतील "सुदर्शन चक्र " कश्याशी संबंधित आहे ?

a ) श्रमशक्ती b ) शक्ती c ) चैतन्य d ) शुभंकर

II ) लोकांच्या या प्रवृतीचा निरंजनला राग आला होता .

a ) बेफिकीरपणाचा b ) बेफिकीर प्रवृत्तीचा c ) आगाऊपणाचा d )अति चागुलपणाचा

III ) " स्वप्न करू साकार " या कवितेत कवीच्या मते कश्याचा ललकार घुमवू या ?

a ) तनामणाचा b ) उत्क्रांतीचा c ) विश्वाचा d ) श्रमशक्तीचा

IV ) निरंजन पुलावर पोहोचला तेव्हा -------- वाजून गेले होते .

a ) सव्वा नऊ b ) साडेनऊ c ) ९ .४० d ) ९ .५०

V ) आयुष्याचे फार मोठे तत्वज्ञान लेखकांना भावे सरांच्या शिकवणूकीतून ----------

a ) समजल b ) गवसलं c ) कळले d ) a ,b ,c सर्व

VI ) निरंजनच्या जवळ येऊन ----------- त्याचं नाव विचारल .

a ) बातमीवाल्यांनी b ) वार्ताहारांनी c ) चित्रकारांनी d ) पेपरवाल्यांनी

VII ) सुश्रुतने बघितलेल्या नाटकाचे नाव

a ) धमाल बालनाट्य b ) विनोदी बालनाट्य c ) धमाल विनोदी बालनाट्य d ) भन्नाट बालनाट्य

VIII ) थोर व्यक्तिमत्वाच्या व्यक्तीचा लेखकावर प्रभाव पडून त्याच्या आयुष्याची गाथा लिहिण्याची प्रेरणा लेखकाला मिळते तेव्हा ---------जन्म होतो .

a ) आत्मचारीत्याचा b ) चरित्राचा c ) कथेचा d ) नाटकाचा

IX ) एकाच कुटुंबातील दोन घटक ------

a ) कथा –चरित्र b ) कथा –आत्मचरित्र c ) चरित्र- आत्मचरित्र d ) आत्मचरित्र-प्रवासवर्णन

X ) सैनिकाचे औक्षण केले जाते –

a ) भरलेल्या डोळ्यांनी b ) डोळ्यातील आसवांच्या ज्योतींनी
c ) भाकरीच्या तुकड्याने d ) मोठ्या अंतकरणाने

**B .सूचनेनुसार कृती करा . ( 10 x 1 =10 )**

I ) शाळेत कसा जाऊ असा प्रश्न माशेलकरांना पडला ,कारण –

a ) माशेलकरांची परिस्थिती अटीतटीची होती
b ) प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली होती
c ) शाळेला जायला उशीर झाला होता
d ) माशेलकरांना फी भरणे शक्य नव्हते

II ) मालती निवास मुंबई तील या भागात होते –

a ) माशेल b ) खोतवाडी c) गिरगाव d ) खेतवाडी

III ) पायांचे वातावरणात उमटलेले ठसे पुसण्यासाठी ---

a ) खाजगी वाहने वापरावीत c ) पेट्रोल कमी वापरावे
b ) झाडे लावावीत d ) वरील काहीच नाही

IV ) टेक्नोसावी म्हणजे

a ) आभासी वास्तव c ) तंत्रज्ञानाचा जेमतेम वापर
b ) अंधश्रद्धा न मानणारा d ) तंत्रज्ञानाच्या आहारी गेलेला

V ) वार लाऊन जेवणे याचा अर्थ काय ?

a ) दिवस भर उपाशी राहणे c ) रोज वेगवेगळ्या घरी जेवने
b ) जेवणासाठी लाईन लावणे d ) रोज एकाच घरी जेवणे

VI ) “ खरा नागरिक “ या पाठातून आपल्याला कोणता गुण शिकता येईल ?

a ) प्रामाणिकपणा c ) आज्ञाधारकता
b ) शिस्त d ) चांगला नागरिक बनणे

VII ) तपोवनाच्या प्रवेशद्वारापाशी हि होती ?

a ) लहान मुले c ) खूप बायका
b ) गोलाकार कमान d ) दुकान

VIII ) निरंजन कोणत्या विचाराने हुरळून गेला ?

a ) मोठा अपघात होणार होता c ) फी कशी भरू या विचाराने
b ) नागरिक शास्त्राचा पेपर बुडणार होता d ) आपणही मोठ झाल्यावर गाडीतून फिरू

IX ) पहाटेची वेळ अभ्यासाठी योग्य असते हा गुरुजींनी सांगितलेला सल्ला अगदी योग्य होता कारण –

a ) सकाळच्या टवटवीत आणि प्रसन्न वातावरणात अभ्यास चटकन होतो
b ) शरीरही ताजतवान बनलेलं असत
c ) प्रसन्न वातावरणात गणित चटकन कळतात
d ) वरील सर्व

X ) मातीचे हो मंगल -------

a ) ललकार b ) शुभंकर c ) तनमन d ) भविष्य